एस.सी.सी. ५२३९/२०२२

**निशाणी १६**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,</u>**

माझे नाव —आकाश काशिनाथ धाडगे	वय वर्ष — ३०
व्यवसाय — नोकरी, बजाज फायनान्स	राहणार — बु—हाननगर
तालुका – नगर	जिल्हा – अहमदनगर

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. यु. कडलग यांच्या मार्फत</u> –**

१. दिनांक २२.०५.२०२२ रोजी मी देऊळगाव सिध्दी येथे पंचनाम्यासाठी गेलो होतो. त्यावेळी माझ्यासोबत गणेश पानसरे हे होते. घटनास्थळ मॅनेजर वैभव वाघ यांनी दाखवले होते. घटनास्थळ हे देऊळगाव सिध्दी गावात होते. ज्या कंपनीने घराचा ताबा घेतला होता त्याचे सिल तोडले होते. त्याचा पंचनामा पोलीसांनी आमच्यासमक्ष केला होता. मला दाखवण्यात आलेल्या पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी १७** देण्यात येते. पंचनाम्यावेळी काढलेले फोटो मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. त्यांना आर्टिकल 'अ' देण्यात येते.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास श्री. बी. एल. बोठे यांचेमार्फत</u>**

२. मी सध्या बजाज फायनान्स येथे कार्यरत आहे. घटनेवेळी मी मोतीलाल ओस्वाल फायनान्स कंपनीमध्ये होतो. वैभव वाघ हे आमचे मॅनेजर होते. गणेश पानसरे पंच हे देखील त्याच फायनान्समध्ये होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे घर देऊळगाव पासुन पश्चिमेला दिड किलोमिटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की,

एस.सी.सी. ५२३९/२०२२

**निशाणी १६**

आरोपीच्या घराच्या बाजुला राहती घरे आहेत. सिल तोडण्याच्या वेळी आम्ही गेलो होतो. सिल तुटलेले कुलुपाचा फोटो काढला होता. मला दाखवण्यात आलेला आर्टिकल 'अ' हा तोच फोटो आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर फोटोत कडीला कुलूप दिसते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, त्याला सिल नाही. कंपनीचे ऑफिस प्रेमदान चौकात आहे. घटनास्थळापासून आमचे ऑफिस साधारण ३५ किलोमिटर असल्याबाबत मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणतेही सिल तोडलेले नव्हते व केवळ वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सही केली व तशी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपासणी नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

DEEPALI NARENDRA MHETRE
Digitally signed by DEEPALI NARENDRA MHETRE
Date: 2025.10.07 14:01:29 +0530

**( दिपाली एन. म्हेत्रे )**
अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
**न्यायालय क्रमांक २०, अहमदनगर.**

दिनांक– ०७/१०/२०२५
ठिकाण – अहमदनगर.